REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# वस्तू व सेवा कराचे स्वरुप, फायदे, तोटे व परिणाम : एक आढावा




प्रा. डॉ. प्रज्ञा बागडे
विभागप्रमुख, अर्थशास्त्र , डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस.कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.

## प्रस्तावना

कोणत्याही शासनाला आपले दायित्व पूर्ण करण्यासाठी उत्पन्नाची आवश्यकता आहे. कर हा उत्पन्न प्राप्तीचा मोठा व महत्वाचा स्त्रोत आहे. ज्याचा उपयोग लोक कल्याणाच्या योजनांसाठी केला जातो. देशाच्या कर व्यवस्थेतून शासनाला पाहिजे त्या प्रमाणात महसूल मिळत नसेल तर शासनाला लोक-कल्याणकारी योजना कार्यान्वित करण्यात अडचणी निर्माण होतात. म्हणून कोणत्याही देशाच्या मजबूत विकासासाठी प्रशासन आणि शाश्वत विकासाची करप्रणाली ही निर्देशक मानली जाते. कार्यक्षम कर प्रणालीमुळे सामाजिक उद्दिष्ट्ये आणि आर्थिक वृद्धीस चालना मिळण्यासाठी आवश्यक सार्वजनिक निधीची दीर्घकालीन सुनिश्चितता मिळविता येते. करांचे प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर असे दोन प्रकार पडतात. प्रत्यक्ष कर उत्पन्नावर लावले जातात त्याचे संक्रमण करता येत नाही. तर अप्रत्यक्ष कर हा वस्तू व सेवांवर लावला जात असून त्याचे संक्रमण करता येते. या करांचा भार संपूर्णत: उपभोक्ता वर्गावर पडतो. अप्रत्यक्ष कर प्रणालीतील दोषांमुळे कर चुकवेगिरीचे प्रमाण वाढते. परिणामत: सरकारच्या महसूलात घट होवून देशाच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होतो.

भारतातील कर प्रणालीमध्ये केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था या सर्वांना विविध प्रकारचे कर आकारणीचे अधिकार असल्यामुळे सामान्य नागरिकापासून, व्यापारी आणि उत्पादकांनाही एकाच वस्तू आणि सेवांसाठी अनेक कर भरावे लागत असे. वस्तूच्या मूळ उत्पादनाच्या ठिकाणापासून ग्राहकांपर्यंत पोहचवण्यासाठी त्या वस्तूची वाहतूक करतांना अनेक टप्प्यांवर कर भरावा लागत असे. ही स्थिती बदलण्यासाठी संपूर्ण देशभरात कोणत्याही वस्तू किंवा सेवेसाठी एकदाच कर भरण्यात यावा, कोणतीही वस्तू किंवा सेवा जिथे पुरविली जाणार आहे अशा एकाच ठिकाणी कराची आकारणी केली जावी. करांची पुनरावृत्ती टाळल्यामुळे ग्राहकाला कमी दरात वस्तू व सेवा मिळेल. ह्या संकल्पनेतून वस्तू व सेवा कराचा (GST) जन्म झाला.

वस्तू व सेवाकरामुळे (GST) यापूर्वीचे विक्री कर, सेवा कर, एक्साइज कर, लक्झरी कर, मनोरंजन कर आणि वॅट सारखे सर्व कर रद्द होतील. राज्य व केंद्र सरकारच्या विविध कर प्रणालीला पर्याय म्हणून वस्तू व सेवाकराकडे (GST) पाहिले जाईल. ह्या करप्रणालीमुळे केंद्र व राज्य सरकारला समान वाटा मिळेल.

## पार्श्वभूमी

भारताला जरी हा वस्तू आणि सेवा कर (GST) नवीन असला तरी वस्तू व सेवा कराला विश्वात १६५ देशांनी या आधीच स्विकारले आहे. जगात सर्वप्रथम फ्रान्सने १९५४ मध्ये ही करप्रणाली स्वीकारलेली आहे. कॅनडात १९९१ पासून ह्या कर आकारणीला सुरुवात केली. २०१५ मध्ये मलेशियातही ही कर प्रणाली स्वीकारण्यात आली. भारतात सर्वप्रथम २००३ मध्ये केळकर समितीने सुद्धा कर सुधारणांचा भाग म्हणून वस्तू व सेवा करांची शिफारस केली होती. २००६-२००७ मध्ये केंद्रिय अंदाजपत्रकाच्या वेळी तत्कालीन अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी वस्तू व सेवा कर लागू करण्याचा उल्लेख केला.

२८ फेब्रुवारी २००६ रोजी केंद्रिय अर्थमंत्र्यानी प्रत्येक राज्याच्या अर्थमंत्र्याच्या अधिकारीता समितीला वस्तू व सेवा कराचा आराखडा तयार करुन वस्तू व सेवा कराच्या विविध पैलू विषयी अभ्यास करुन तसा अहवाल सादर करावा असे निर्देश दिलेत. २०१४ मध्ये मोदी सरकार अस्तित्वात आले त्यांनी हे विधेयक राष्ट्राची गरज आहे असे सांगून ६ मे २०१५ रोजी 'जीएसटी बील' लोकसभेत मंजूर करुन घेतले. त्यावर राज्यसभेत सखोल विचारमंथन होवून १२२ व्या घटनादुरुस्तीद्वारे ऑगस्ट २०१६ ला राज्यसभेत

व ८ ऑगस्ट २०१६ ला लोकसभेत मंजूर होवून देशात नवीन कर प्रणाली लागू करण्याच्या अनेक अडचणी दूर झाल्यात. सध्या संपूर्ण जगात जीएसटी लागू करणाऱ्या १६५ देशांच्या पंक्तीमध्ये १६६ वा देश झाला आहे. जीएसटी हा स्वातंत्र्योत्तर काळातील अप्रत्यक्ष कर प्रणाली मधील सर्वात महत्वाचा व मोठा बदल आहे. ह्या बदलामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर दुरगामी सकारात्मक परिणाम होणार आहे.

## वस्तू व सेवा कर (GST) ची आवश्यकता

भारतातील अप्रत्यक्ष कर प्रणालीतील दोषांमुळे निर्माण झालेल्या समस्यांवर उपाय म्हणून जीएसटी लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला. भारतात केंद्र व राज्य सरकारद्वारे अनेक वेगवेगळे अप्रत्यक्ष कर आकारले जात होते. विविध राज्यातील अप्रत्यक्ष करांचे संकलनही समाधानकारक नव्हते, यात कर चुकवेगिरी आणि भ्रष्टाचाराचे प्रमाणही वाढले होते. भारतातील अप्रत्यक्ष कर प्रणालीतील किचकटपणा हा विदेशी गुंतवणूकीसाठी सुद्धा नकारात्मक होता. या सर्व दोषातून मुक्ततेसाठी भारतात 'जीएसटी'ची आवश्यकता होती.

## वस्तू व सेवा कर (GST) ची संरचना व स्वरुप

१. CGST (Central Goods & Service Tax) केंद्र सरकारच्या वतीने आकारण्यातयेणाऱ्या वस्तू व सेवा कराला 'केंद्रिय वस्तू व सेवा कर' असे म्हणतात.

२. SGST (State Goods & Service Tax) राज्य सरकारमार्फत लावण्यात येणाऱ्या वस्तू व सेवा कराला 'राज्य वस्तू व सेवा कर' असे म्हणतात.

३. IGST (Integrated Goods & Service Tax) आंतरराज्य वस्तू व सेवांच्या पुरवठ्यावर लावण्यात येणाऱ्या वस्तू व सेवा कराला 'एकात्मिक वस्तू व सेवा कर' असे म्हणतात.

अ. राज्यांअंतर्गत झालेल्या व्यवहारावर कर लागेल व या कराचा ५० टक्के हिस्सा केंद्र सरकारला जाईल तर ५० टक्के राज्य सरकारला मिळेल.

ब. व्यवहार दोन राज्यांमध्ये झाला असेल तर कर आकारण्याचा अधिकार केंद्र सरकारला असून जे राज्य त्या वस्तू व सेवांचा उपभोग घेत आहे त्या राज्याला कराचा अर्धा हिस्सा मिळेल. तर कराचा अर्धा हिस्सा केंद्र सरकराला मिळेल.

क. IGST चा संबंध उपभोगाशी आहे. जे राज्य वस्तू व सेवाचा उपभोग घेतो त्या राज्यालाच कर मिळत असतो. अशी संरचना IGST अंतर्गत करण्यात आली आहे.

## वस्तू व सेवा कर (GST) आकारणीचे स्वरुप

सर्वाधिक उपभोगाची पेट्रोलियम उत्पादने, विज-सेवा, कृषी उत्पन्न बाजार समिती इत्यादी जीएसटी च्या कक्षेतून बाहेर ठेवण्यात आले आहे. वस्तू व सेवा कराच्या आकारणीचे स्वरुप खालील पाच स्तरावर करण्यात आले आहे.

### १) ००% वस्तू व सेवा कर

जीवनावश्यक वस्तू जीएसटीमधून मुक्त ठेवल्या आहेत त्या वस्तू व सेवांचा अंतर्भाव यात केलेला आहे. यात ताज्या भाज्या, पॅकबंद न केलेले अन्नधान्य, दूध, दही, अंडी, पीठ, बेसन, ब्रेड, पॅक बंद नसलेले पनीर, मध, फ्रेश मटन, फिश, चिकन, वर्तमान पत्र, शैक्षणिक सेवा, आरोग्य सेवा इ. वस्तूंचा समावेश करण्यात आला आहे.

### २) ०५% वस्तू व सेवा कर

या दरात खाद्य तेल, स्किल्ड दूध, साखर, चहापत्ती, भाजलेल्या कॉफीबिया, मसाले, पिज्जा ब्रेड, रस, साबुदाना, केरोसिन, पॅकबंद पनीर, काजू, एल पी जी, पादत्राणे (५०० रु. पर्यंतची), कपडे (१००० रु. पर्यंतचे), रेल्वे तिकीट, लहान हॉटेल, अगरबत्ती या वस्तूंचा समावेश करण्यात आला आहे.

LBP PUBLICATION

### ३) १२% वस्तू व सेवा कर

या दरात सॉस, फ्रुट ज्यूस, भुजिया, नमकीन, आयुर्वेदिक औषधी, फ्रोजन मीट प्रोडक्टस, बटर, पॅक ड्राय फ्रुट्स, एनिमल फॅट, टुथ पावडर, अगरबत्ती, कलर बुक्स, छत्री, सिलाई मशीन, सेलफोन इ. तसेच नॉन एसी हॉटेल्स, विमान तिकीटे इत्यादीचा समावेश आहे.

### ४) १८% वस्तू व सेवा कर

जॅम, सॉस, सूप, आईसक्रीम, इंस्टेट फ्रुट मिक्सेज, मिनरल वॉटर, फ्लेवर्ड रिफाईंड शुगर, पास्ता, कॉर्नफ्लेक्स, पेस्ट्रीज, केक इत्यादी वस्तूंवर तसेच एसी हॉटेल्स, टेलीफोन सेवा, आयटी सेवा, ब्रान्डेड गारमेन्ट्स वर १८% वस्तू व सेवा कर लावण्यात येईल.

### ५) २८% वस्तू व सेवा कर

या दरात पेन्ट, डिओडरन्ट, सेव्हींग क्रीम, हेअर शॅम्पू, डाई, सनक्रीम, वॉलपेपर, सीरॅमिक, टाईल्स, च्युइंगम, पान मसाला, डिश वॉशर, वॉशिंग मशीन, एटीएम, वेंडींग मशीन, ऑटोमोबाईल्स, मोटर सायकल इत्यादी वस्तूंवर तसेच फाइव्ह स्टार हॉटेल, रेसक्लब, सिनेमागृह इत्यादींचा समावेश आहे.

## वस्तू व सेवा कर (GST) ची कार्यपद्धती

१. या करपद्धतीच्या अंमलबजावणीची संपूर्ण यंत्रणा ही ऑनलाईन असेल.

२. अप्रत्यक्ष कराच्या क्षेत्रामध्ये प्रस्ताविक नीवन वस्तू व सेवा कर प्रणाली अंतर्गत ००,०५,१२,१८ आणि २८ टक्के असे पाच स्तरीय कर व्यवस्था निश्चित केली.

३. कायदेशीर चौकटीमध्ये प्रामुख्याने या कर पद्धतीशी संबंधीत कायदे मंजूर करवून घेणे.

४. जेथे वस्तू व सेवांचा पुरवठा आंतर-राज्य व्यापारामध्ये येतो (IGST) तेव्हा वस्तू व सेवा कराच्या बाबतीत कायदे करण्याचे विशेष अधिकार संसदेस असतील.

५. केंद्राने आकारावयाच्या वस्तू व सेवा कराच्या बाबतीत कायदे करण्याचे अधिकार संसदेस असतील तर राज्यांनी आकारावयाचा वस्तू व सेवा कराच्या बाबतीत कायदे करण्याचे अधिकार राज्य विधान मंडळास असतील.

६. वस्तू व सेवा कराच्या आंतर-राज्य व्यापार किंवा वाणिज्य संबंधी कर आकारण्याचे आणि गोळा करण्याचे अधिकार भारत सरकारला आहे. वस्तू व सेवा कर परिषदेने शिफारस केल्याप्रमाणे संसदेने कायद्याने या कराची विभागणी केंद्र व राज्यांमध्ये करण्यात येईल.

७. यासाठी विविध कर विभागात विभागलेल्या विद्यमान कर्मचारी वर्गाचे एकत्रिकरण करणे आणि त्यांना प्रशिक्षण देणे हा कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे.

८. विद्यमान प्रचलित विविध करांसाठी नोंदणीकृत उद्योग किंवा व्यापारी संस्थांना वेगळी नोंदणी करण्याची आवश्यकता राहणार नाही. त्यांची माहिती व डाटा 'जीएसटी' यंत्रणेत स्थलांतरीत करण्यात येईल. नव्याने अर्ज करणाऱ्यांना ऑनलाईन अर्ज करुनच स्वत:ची नोंदणी करावी लागेल. पॅन आधारित नोंदणी क्रमांक राहणार आहे.

## वस्तू व सेवा कर (GST) चे फायदे

१९४७ नंतर अप्रत्यक्ष कराच्या आकारणीत प्रथमच ग्राहककेंद्री दृष्टीकोन 'वस्तू व सेवा कर' च्या माध्यमातून दिसून येत आहे. त्यामुळे ही करप्रणाली लागू झाल्यानंतर त्याचा सर्वाधिक फायदा सामान्य नागरिकांना होणे अपेक्षित आहे. देशाला या वस्तू व सेवा कराच्या माध्यमातून खालील लाभ अपेक्षित आहेत.

- एकच कर असल्यामुळे करात पारदर्शकता येईल. कर भरण्याच्या व आकारण्याच्या पद्धतीत सहाय्यता आणि सुलभता येईल.
- देशाचा GDP वाढून देशाची आर्थिक विकासाकडे वाटचाल होईल.
- जीएसटी अंतर्गत विविध प्रकारच्या वस्तूंचे सोपे आणि साधे वर्गीकरण झाले असल्यामुळे कर लावतांना वस्तूंचे वर्गीकरण वादग्रस्त ठरणार नाही.
- वस्तू व सेवांच्या किंमती दीर्घकाळपर्यंत स्थिर राहतील, याचा फायदा ग्राहकांना निश्चितच होईल.



LBP PUBLICATION

● जीएसटीमुळे उत्पादक कंपन्यांना फायदा होवून देशात एकसंघ बाजारपेठ तयार होईल.

● ज्या उद्योगांची वार्षिक उत्पादकता २० लाखपर्यंत आहे अशा उद्योगांना जीएसटीमधून मुक्त ठेवण्यात आल्याने त्याचा फायदा लहान उद्योगांना होईल.

● राज्यांना पहिली पाच वर्षे केंद्र सरकार महसुलात तोटा भरुन देईल त्यामुळे राज्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यात मदत होईल. ज्या राज्यात ग्राहक वर्ग मोठा असेल त्या राज्यांना करात जास्त वाटा मिळेल.

● पहिली तीन वर्षे राज्यांना १०० टक्के भरपाई दिली जाईल. नंतर चौथ्या वर्षाला ७५ टक्के व पाचव्या वर्षाला ५० टक्के भरपाई दिली जाईल.

● 'एक राष्ट्र-एक कर' ही संकल्पना समाजात रुजेल, एका राज्यातून दुसऱ्या राज्यात व्यापार करतांना व्यापाऱ्यांना होणारा त्रास कमी होवून कर व्यवस्थेविषयी विश्वासाचे वातावरण निर्माण होईल.

● देशात वस्तू व सेवांची किंमत एकसारखी असल्यामुळे राज्या-राज्यात व ग्राहकांमध्ये भेदभाव केला जाणार नाही.

● जीएसटीमुळे असंघटीत उद्योगही कराच्या राज्यात येईल त्यामुळे सरकारचे उत्पन्न वाढेल आणि संघटीत व असंघटीत क्षेत्रातील तफावत कमी होईल.

● जीएसटीमुळे अत्यावश्यक वस्तू व सेवा कराचे प्रमाण अल्प ठेवले असल्यामुळे महागाईच्या दरात घट होईल. अत्यावश्यक वस्तू खरेदी करणे सर्वसामान्य उपभोक्त्याच्या आवाक्यात येईल.

● जीएसटीची जास्तीत जास्त कर मर्यादा २८ टक्क्यांपर्यंत असल्यामुळे ज्या वस्तू व सेवांवर सध्या ३० ते ४० टक्के कर लावले जात होते अशा वस्तूंच्या किंमती कमी होतील.

● जीएसटी लागू होण्याचा सर्वात मोठा फायदा सर्व सामान्य व्यक्तीला होणार आहे. संपूर्ण भारतात कोणतीही वस्तू खरेदी करण्यासाठी एकच कर द्यावा लागेल. सर्व राज्यात एका वस्तूची किंमत सारखीच राहणार आहे.

● जीएसटी लागू झाल्यामुळे एकाच वस्तूसाठी अनेकवेळा कर देण्याची गरज भासणार नाही. कर वसुली करतांना वसुली अधिकाऱ्यांकडून अफरातफर करण्याची संभावना कमी होईल.

## वस्तू व सेवा कर (GST) चे तोटे

● जीएसटी ही ऑनलाईन करप्रणाली आहे. लहान व्यापाऱ्यांना ऑनलाईन पद्धतीची पुरेशी माहिती नसल्यामुळे त्यांना कराचे शोधन करण्यासाठी त्रास सहन करावा लागेल.

● जीएसटीमध्ये ज्या वस्तू आणि सेवावर १८ टक्के कर मर्यादा ठरविली आहे. ते कर वाढणार नाही असे आश्वासन नाही. ती कर मर्यादा वाढू शकते. तसेच सध्या ज्या वस्तू आणि सेवावर कमी कर आहे त्या करामध्ये वाढ झाली तर उपभोक्त्यावर भुर्दंड पडेल.

● जीएसटीचा मोठा फटका बांधकाम क्षेत्राला बसणार आहे. नवीन घर व फ्लॅटच्या विक्रीवर १२ टक्के जीएसटी लागू झाल्यामुळे घर आणि फ्लॅटच्या किंमती वाढल्या. फ्लॅटला खरेदीदार मिळणे कठीण झाले आहे. बिल्डर अडचणीत आले आहे. ह्या क्षेत्रात बेकारी वाढण्याची शक्यता आहे.

● जीएसटी लागू होण्यापूर्वी बँका आणि वित्तीय संस्थाद्वारे पुरविल्या जाणाऱ्या सेवावर १८ टक्के जीएसटी लागत आहे. त्यामुळे बँका आणि वित्तीय संस्थाचे व्यवहार महाग झाले आहे. बँकेच्या ग्राहकाला आर्थिक व्यवहाराकरीता आधीपेक्षा जास्त पैसे लागत आहे.

● जीएसटीमध्ये केंद्र व राज्याचा जीएसटी स्वतंत्र असेल अशी तरतूद आहे. परंतु जमा होणारा महसूल राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. महापालीकेची जकात रद्द होत आहे. त्यामुळे राज्याच्या विकासाला पुरेसा पैसा उपलब्ध होणार नाही.

## वस्तू व सेवा कर (GST) चे विविध क्षेत्रावर होणारे परिणाम

पूर्वी अप्रत्यक्ष कराची आकारणी राज्य सरकार व केंद्र सरकार वेगवेगळ्या पद्धतीने करीत असत. कर गोळा करण्याची ही पद्धत क्लिष्ट होती. या क्लिष्ट कर प्रक्रियेमुळे वस्तू व सेवांच्या किंमतीमध्ये वाढ झाल्यामुळे देशात निर्माण होणारी भाववाढ हा करव्यवस्थेचा परिणाम होता. अनेक करांमुळे कर भरणाऱ्या घटकांना या कर प्रणालामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असे. या

मधूनच गैर-कारभार, कर चुकवेगिरी, भ्रष्टाचार, करावर कर असे परिणाम झाले होते. या सर्व बाबींमधून सुटका होण्यासाठी 'एक राष्ट्र-एक कर' ही प्रणाली परिणामकारक राहील. ह्या दृष्टीने ह्या कर प्रणालीकडे पाहिले जात आहे.

### अ) उद्योग क्षेत्रावर परिणाम

- **कराचा वाढीव बोझा -** औद्योगिक उत्पादन करणाऱ्या लघु व मध्यम उद्योगांमध्ये आतापर्यंत दिड कोटी वार्षिक उलाढाल असलेल्या उद्योगांनाच केंद्रिय उत्पादन शुल्क भरावे लागत होते. मात्र आता २० लाख रु. वार्षिक उलाढाल असणाऱ्या व त्या पुढील उद्योगांनाच कर भरावा लागणार आहे.
- **कर गोंधळ -** आर्थिक वर्ष २०१७ -१८ एप्रिल पासून सुरु झाले, जीएसटी मात्र १ जुलै पासून म्हणजे चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाही अखेर लागू झाले. आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीसाठी वेगळी कररचना तर उर्वरीत महिण्यासाठी जीएसटी यामुळे गोंधळ झाला आहे.
- **संगणकीय रचनेत बदल -** केंद्रिय उत्पादन शुल्क मूल्यवर्धीत कर व सेवा कर भरता यावा यासाठी देशातील जवळपास प्रत्येक एसएमईने विशेष संगणकीय सॉफ्टवेअर किंवा इआरपी तयार करुन घेतले आहे. जीएसटी लागू झाल्यानंतर यामध्ये त्यांना बदल करावा लागला. नवी प्रणाली वापरण्याचे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना द्यावे लागले.
- **पेट्रोलियम उत्पादनावर जीएसटी नाही -** जीएसटी लागू होईपर्यंत तरी पेट्रोलियम उत्पादनावर तो लावण्यात आला नाही. मात्र भावी काळात यात बदल होऊ शकतो. राज्यांना पेट्रोलियम उत्पादनावर कर लावण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यामुळे उत्पादनाशी संबंधीत उद्योगांना टॅक्स इनपेमेंट क्रेडीटचा लाभ मिळेल की नाही याबद्दल अनिश्चितता निर्माण झाली आहे.
- **किंमती वाढण्याची शक्यता -** जीएसटी ००, ०५, १२, १८, २८ अशा पाच स्तरावर लागू झाली आहे. काही क्षेत्रात पहिल्यापेक्षा अधिक कर लागणार, त्यामुळे काही वस्तू महाग होण्याची शक्यता आहे.
- **विविध राज्यात नोंदणी आवश्यक -** एकाच वेळी अनेक राज्यात व्यवसाय करणाऱ्या एसएमई सह अन्य उद्योगांना प्रत्येक राज्यात स्वतंत्र नोंदणी करुन घ्यावी लागणार आहे. त्यामुळे करपूर्ततेसाठी उद्योगांवर बोझा वाढला आहे.
- **कामकाज खर्च -** जीएसटी ही अप्रत्यक्ष कराची वेगळीच व नवीन पद्धत असल्यामुळे एसएमई ना त्यासाठी बाहेरुन सेवा घ्यावी लागत आहे. त्यामुळे त्यांचा कामकाज खर्च वाढत आहे.
- **ऑनलाईन शॉपिंगमुळे समस्या -** अनेक एसएमईनी ऑनलाईन वस्तू विक्री मंच सुरु केलेले आहेत. या वेबसाइटच्या आधारे एसएमई आपल्या मालाची विक्री अनेक राज्यात करतात. आता प्रत्येक राज्यात स्वतंत्र नोंदणी करावी लागणार असल्यामुळे एसएमई च्या ऑनलाईन विक्री मंचाचे भवितव्य अंधारात दिसत आहे.

### ब) बँकींग व सेवा क्षेत्रावर परिणाम

- बँका व बिगरबँक वित्त संस्था यांना प्रत्येक राज्यातील कामकाजासाठी जीएसटी अंतर्गत वेगळी नोंदणी करावी लागणार आहे.
- व्यावसायिक, कारखानदार, व्यापारी व कामगार हे अधिक चांगल्या संधीच्या शोधात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात असतील तर त्यांना सेवा देणाऱ्या संस्थेकडे त्यांचे वेगवेगळे पत्ते असतील. त्यामुळे केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.
- एकाच बँकेच्या दोन शाखांमधील व्यवहाराकरिता कर लागू शकेल त्यामुळे बँकांची शाखानिहाय डोकेदुखी वाढणार आहे.
- बँकांना स्वत:च्या संगणकीय प्रणालीत बदल करुन घ्यावे लागत आहे. खाते नोंदणी पद्धत, प्रशासन, नियंत्रणाची पद्धत यामध्येही बदल करावे लागत आहे.
- डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, इंटरनेट बँकींग, चेक क्लिअरन्स, आरटीजीएस, निधी हस्तांतरण, डिमेट खाते इ. सेवावरील सेवा कर वाढवून १८ टक्के करण्यात आला आहे. यामुळे या सर्व सेवा वाढल्या आहेत.

### क) इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रावर परिणाम

- **स्मार्ट फोन** – स्मार्ट फोनवर एकूण १३.५ टक्के कर लागत होता तो जीएसटी लागू झाल्यानंतर १२ टक्क्यांवर आला आहे. त्यामुळे स्मार्ट फोनच्या किमतीत घट झाली आहे. स्मार्ट फोन तयार करण्यासाठी लागणारे सुटे भाग १२ टक्के जीएसटी अंतर्गत आले आहे. 'मेक इन इंडिया' अंतर्गत देशात तयार होणाऱ्या स्मार्ट फोनला आणखी सवलती देण्याचे सरकारने ठरविल्यास स्मार्ट फोन आणखी स्वस्त होतील.
- **कॅमेरा, मॉनिटर, टिव्ही** – टिव्ही, कॅमेरा, स्पीकर, संगणक, मॉनिटर यांच्यावर १८ टक्के जीएसटी लागणार आहे. त्यामुळे ह्या वस्तू किंचित महाग होण्याची शक्यता आहे.



LBP PUBLICATION

### ड) मनोरंजन क्षेत्रावर परिणाम

- सर्व प्रकारच्या प्रसारण सेवेसाठी टिव्ही, केबल, डीटीएच फिल्म तसेच डिजीटल माध्यमासाठी १५ टक्के कर द्यावा लागत होता. यावर ८ ते १२ टक्के अन्य कराचाही बोझा होता. जीएसटी नंतर १८ ते २० टक्के कर द्यावा लागत आहे. त्यामुळे ग्राहकावरील बोझा कमी होऊ शकतो.
- पीव्हीआर सारख्या चित्रपटगृह साखळीसाठी जीएसटी लागू होणे पथ्यावर पडणार आहे. त्यामुळे चित्रपट निर्मात्यांसाठी जीएसटी लाभदायक होणार आहे.
- मल्टीप्लेक्सना २७ टक्के कर द्यावा लागत होता. जीएसटी लागू झाल्यानंतर कराचा बोझा कमी होऊ शकतो.
- स्थानिक संस्थाकडून लावला जाणारा मनोरंजन कर मूळ जीएसटी बरोबर लावला जाणार आहे.

### इ) जाहिरात क्षेत्रावर परिणाम

- एफएमसीजी उद्योगांना पूर्ण इनपूट टॅक्स क्रेडीट मिळणार आहे. त्यामुळे जाहिरातीचा खर्च कमी होण्याची शक्यता आहे.
- वाहन उद्योगातील कंपन्यांना इनपूट क्रेडीटचा लाभ मिळणार असल्यामुळे वाहनाच्या जाहिरातीवरील खर्च कमी होईल.


### निष्कर्ष

वस्तू व सेवा कर (GST) हे भारताच्या अप्रत्यक्ष कर सुधारणा क्षेत्रातील एक महत्वपूर्ण पाऊल आहे. केंद्र व राज्य शासनाच्या अनेक करांचे एकत्रिकरण फक्त एका करात केल्याने समान राष्ट्रीय बाजारपेठ निर्माण होईल. करांतील गुंतागुंत कमी होवून भ्रष्टाचाराच्या वाटा बंद होवून विकासाचा वेग वाढेल, आर्थिक क्रियाशिलता वाढेल. कोणत्याही परिवर्तन व्यवस्थेत सुरुवातीला परिवर्तनाचा त्रास सर्वसामान्य जनतेला सहन करावा लागतोच. कारण त्यामागे भविष्यात चांगले फळ मिळेल ही अपेक्षा असते. केंद्र सरकारने येत्या तीन वर्षापर्यंत राज्य सरकारच्या महसुलातील तोटा १०० टक्के व चौथ्या वर्षी ७५ टक्के व पाचव्या वर्षी ५० टक्के भरुन देण्याचे आश्वासन दिले आहे. याचा राज्य सरकारला फायदा होईल. जीएसटीचे दर सुस्पष्ट असल्यामुळे राज्य सरकार व केंद्र सरकार महसुलाविषयी अंदाज बांधून कल्याणकारी योजनांची आखणी चांगल्या प्रकारे करु शकतील.

एकंदर, जगभरामध्ये दिडशेहून अधिक देशात या प्रणालीचा यशस्वीरीत्या स्विकार केलेला आहे म्हणून भारतातही याची यशस्वीता अपेक्षित आहे.

### संदर्भ :

१) वस्तू व सेवा कर एक दृष्टीक्षेप : वित्त विभाग महाराष्ट्र शासन.
२) जीएसटी कायदा (तोंड ओळख) ॲड. गोविंद पटवर्धन.
३) योजना मासीक : ऑगस्ट २०१७.
४) उद्योजक मासीक : २०१७.
५) अर्थसंवाद -मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासीक जूलै-सप्टेंबर २००५.
६) अर्थसंवाद -मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासीक जूलै-सप्टेंबर २०१६.
७) लोकमत समाचार वृत्तपत्र : २० मे २०१७.
८) सकाळ ऑनलाईन आवृत्ती : ८ ऑगस्ट २०१६.
९) लोकमत ऑनलाईन आवृत्ती : १ जुलै २०१७.



**प्रा. डॉ. प्रज्ञा बागडे**
विभागप्रमुख, अर्थशास्त्र , डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस.कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.

LBP PUBLICATION